# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक : २५६२११९८/९९/२१
फॅक्स : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई–मेल : regis@unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे–४११००७.

संदर्भ क्र. आर/2/४२६ दि. १०/१२/२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य, संचालक, सर्व संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये/ परिसंस्था**
**मा. विभागप्रमुख/संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/ प्रशाला, विद्यापीठ परिसर**
**मा. संविधानिक/प्रशासकीय अधिकारी/शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग,**

**विषय : दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी पुणे पुस्तक महोत्सव २०२४ आणि भारतीय भाषा महोत्सवात सक्रीय सहभागी होण्याबाबत**

महोदय,

पुणे पुस्तक महोत्सव २०२४ ह्या उपक्रमाचे आयोजन दिनांक १४ ते २२ डिसेंबर २०२४ ह्या कालावधीत फर्गसन महाविद्यालय परिसरात करण्यात आलेले आहे. शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय पुस्तक न्यास नवी दिल्ली, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, फर्गसन महाविद्यालय, पुणे महानगरपालिका ह्या महोत्सवाच्या संयोजक संस्था आहेत. ह्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक व प्रशासकीय विभाग, दोन्ही उपपरिसर तसेच पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील सर्व संलग्नित/स्वायत्त महाविद्यालये, परिसंस्था ह्यांनी महोत्सवात सक्रीय सहभागी व्हावे. सर्व प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, तसेच सर्व पालक आणि माजी विद्यार्थी ह्यांनाही आवाहन करण्यात येत आहे की आपण ह्या महोत्सवात सक्रीय सहभागी होऊन ह्या महोत्सवाला सांस्कृतिक भव्यतेचे स्वरूप प्राप्त होण्यात आपले सक्रीय योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**अ.** दिनांक : ११ डिसेंबर, २०२४ : दुपारी १२.०० ते १.०० : **शांतता!.... पुणेकर वाचत आहेत..** : पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील विद्यापीठाचे सर्व घटक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी व पालक **आपल्या आवडत्या पुस्तकाचे वाचन करतील आणि त्याचा फोटो अथवा व्हिडीओ सोबत दिलेल्या QR कोड स्कॅन किंवा pbf24.in/register** वर तो पाठवावा. सोशल मिडीयावर **#पुणेपुस्तकमहोत्सव** यासह पोस्ट करावा.

**आ.** **पुणे पुस्तक महोत्सव** :दिनांक १४ डिसेंबर ते २२ डिसेंबर २०२४: सकाळी ११.०० ते रात्री ८.०० : एकूण ९ दिवसांत किमान १ दिवस पुणे पुस्तक महोत्सवास प्रत्यक्ष भेट द्या. ग्रंथ दालनांना भेट देतील आणि इच्छेनुसार ग्रंथ खरेदी करता येतील, पुणे साहित्य महोत्सवात लेखकांना भेट, पुणे सांस्कृतिक महोत्सवात कलावंतांच्या सादरीकरणाचा आणि पुणे खाद्य महोत्सवात खाद्यसंस्कृतीचा आनंद घेता येईल.

इ. **विश्वविक्रम उपक्रम :** ह्या उपक्रमाअंतर्गत प्रत्येकाने आपल्या संग्रहातील किंवा आपल्या वाचनालयातील एखादे दुर्मिळ अथवा आवडते पुस्तक घेऊन त्याच्या मुखपृष्ठाचा फोटो/ **https://photoupload.pbf24.in** वर पाठवावा.

ई. **दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी ग्रंथ दिंडी** ह्या उपक्रमात पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी व्हावे.

उ. **भारतीय भाषा महोत्सव : बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०२४ : सकाळी १०.३० ते ११.३०**

शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय पुस्तक न्यास नवी दिल्ली, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे पुस्तक महोत्सव समिती, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे महानगरपालिका ह्यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय कवी सुब्रमण्यम भारती ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ **भारतीय भाषा उत्सव २०२४** कार्यक्रमाअंतर्गत बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० ते ११.३० ह्या वेळेत सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते **मा. श्री. प्रवीण तरडे ह्यांचे विशेष व्याख्यान** विद्यापीठ परिसरातील संत नामदेव सभागृहात आयोजित केले आहे. ह्यात विद्यापीठ विभागातील विद्यार्थी आणि पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील महाविद्यालयांचे/ परिसंस्थांचे राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी होतील.

**तसेच सर्व महाविद्यालये/परिसंस्था यांनी** उद्या बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० ते ११.३० ह्या वेळेत आपल्या महाविद्यालयाच्या सभागृहात हे online व्याख्यान webcast.unipune.ac.in ह्या लिंकवरून दाखवण्याची व्यवस्था करावी. सर्व विद्यार्थी, प्राचार्य, संचालक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक हे **webcast.unipune.ac.in** ह्या लिंकवर सहभागी होतील. उद्या परीक्षेत सहभागी नसलेले विद्यार्थी, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वतः प्राचार्य ह्यांनी ह्या व्याख्यानात आणि उपक्रमात सहभागी व्हावे. त्यासंदर्भातील फोटो आणि व्हिडिओ काढून ठेवावेत. उद्या आपणास लिंक उपलब्ध होईल त्यावर हे फोटो स्वतंत्रपणे पाठवावेत म्हणजे ते आपल्या महाविद्यालयाच्या नावे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित होतील.

व्याख्यानानंतर लगेचच महाविद्यालयात **शांतता!, पुणेकर वाचत आहेत/ भारतीय भाषांतील पुस्तक वाचन उपक्रम** आयोजित करून पुस्तक वाचतांना फोटो किंवा व्हिडिओ काढून pbf24.in/register लिंकवर प्रदर्शित करावेत. **आणि विश्वविक्रम उपक्रम अंतर्गत** आवडीच्या/संग्रहातील/उपलब्ध पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा फोटो अथवा व्हिडिओ काढून **https://photoupload.pbf24.in** लिंकवर प्रदर्शित करावेत.

**विद्यापीठ परिसर :** तसेच विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील विद्यार्थी विभागप्रमुख, संचालक, प्राध्यापक, संविधानिक/प्रशासकीय अधिकारी/शाखाप्रमुख, शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते की, सदर कार्यक्रमाचे शैक्षणिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेऊन बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता संत नामदेव सभागृहात उपस्थित राहून सहभागी व्हावे.

**प्रा. (डॉ.) ज्योती भाकरे**
प्रभारी कुलसचिव

शिक्षण मंत्रालय भारत सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय पुस्तक न्यास, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे पुस्तक महोत्सव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सयुक्त विद्यमाने

# पुणे पुस्तक महोत्सव २०२४

आणि

## भारतीय कवी सुब्रमण्यम् भारती यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भारतीय भाषा महोत्सव २०२४

**दि. बुधवार ११ डिसेंबर, २०२४ रोजी, सकाळी १०.३० ते ११.३० वा.**

स्थळ :- संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Live on : webcast.unipune.ac.in

### विशेष व्याख्यान

**मा. श्री. प्रवीण तरडे**

सुप्रसिद्ध अभिनेता, दिगदर्शक, चित्रपट निर्माता

### अध्यक्ष

**मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी**

कुलगुरू

### सन्माननीय उपस्थिती

**मा. श्री. राजेश पांडे**

संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

**मा. डॉ. पराग काळकर**

प्र-कुलगुरू

शांतता... पुणेकर वाचत आहेत / भारतीय भाषेतील पुस्तक वाचन आणि पुस्तक मुखपृष्ठ अल्बम विश्वविक्रम
वेळ : स. ११.३० ते दु. ०१.०० वा.

पुस्तक वाचत असतानाचा फोटो pbf24.in/register आणि पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा फोटो
https://photoupload.pbf24.in या लिंकवर स्वतंत्रपणे अपलोड करावा.

### विनीत

मा. डॉ. ज्योती भाकरे, प्रभारी कुलसचिव

सर्व व्यवस्थापन परिषदेचे सन्माननीय सदस्य

मा. श्री. रविंद्र शिंगणापूरकर, मा. प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, मा. प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे,
मा. प्रा. डॉ. धोंडीराम पवार, मा. प्रा. संदिप पालवे, मा. डॉ. राजेंद्र विखेपाटील,
मा. श्रीमती बागेश्री मंठाळकर, मा. श्री. सागर वैद्य, मा. प्रा. डॉ. संगीता जगताप,
मा. डॉ. जोत्स्ना एकबोटे, मा. प्रा. डॉ. सुदर्शन कुमार, मा. श्री. विकासचंद्र रस्तोगी,
डॉ. शैलेंद्र देवळाणकर, डॉ. विनोद मोहितकर

डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. सदानंद भोसले, डॉ. अभिजीत कुलकर्णी

भाषा व साहित्य प्रशाला ।। राष्ट्रीय सेवा योजना ।। विद्यार्थी विकास मंडळ ।।
डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे ।। अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील सर्व
संलग्नित महाविद्यालये आणि परिसंस्था